**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक २५५ वा ● सोमवार ०५ फेब्रुवारी २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 255 | Date : 05/02/2024 blow :Monday Page 4 Price 4

## सरकारमध्येच गँगवॉर सुरु झालंय

# एक मिंधेची गँग, एक भाजपाची गँग आणि; उद्धव ठाकरेंचा घणाघात

मुंबई : कोकणातून गुंडांचा सुपडासाफ करायचा आहे विसरु नका. मोदींनी जसा झाडू घेऊन चकचकीत फरशी स्वच्छ केली ना? तशी लोकसभेत इथली घाण साफ करायची आहे हे विसरु नका असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे. गणपत गायकवाड यांनी जो गोळीबार केला ते बाहेर आलं कसं बाहेर आलं? कुणी मागितलं होतं? कुणीच नाही. लबाडाने शिवसेना मिंध्यांची आहे यासाठी फुटेज यांना दिसलं नाही असाही टोला उद्धव ठाकरेंनी लगावला.

गणपत गायकवाड यांनी गोळीबार केला ते त्यांनी मान्यच केलं की गोळ्या घातल्या. तरीही सीसीटीव्ही फुटेज बाहेर आलं. मी गणपत गायकवाड यांची बाजू घ्यायला मुळीच सवांतवाडीत आलो नाही. पण गणपत गायकवाड म्हणाले मिंधे राज्याचा मुख्यमंत्री असेल तर राज्यात गुंडांची पैदास होईल. मिंधेंनी मला गुंड बनवलं कारण पोलीस ठाण्याच्या आवारात मुलाला मारहाण झाली तेव्हा बाप म्हणून गोळीबार केला असं ते म्हणाले आहेत. याची चौकशी होणार आहे की नाही? तसंच त्यांनी म्हटलंय मिंधेंकडे माझे कोट्यवधी रुपये आहेत. पण आरोपानंतर कारवाई होईल का? आता मोदी गॅरंटी कुणाला पावणार? ते बघू असाही टोला उद्धव ठाकरेंनी लगावला.

मी खोटारड्यांचा आणि हुकमशाहीचा विरोधक आहे. आम्ही तुमच्या बरोबर होतो तेव्हा काहीतरी चांगलं होईल



वाटलं होतं. सरकार म्हणजे काय चाललंय? आपले मनोहर जोशी मुख्यमंत्री होते तेव्हा मुंबईत गँगवॉर फोफावलं होतं.

रेल्वे स्टेशन असो किंवा इतरं ठिकाणं कुणीही कुणाला गोळ्या घालत. अनेकदा दिवसाही बातमी यायची. आपल्या युती सरकारने ते गँगवॉर मोडून काढलं होतं. आता दुर्दैव असं आहे की या सरकारमध्येच गँगवॉर सुरु झालंय. एक मिंधेंची गँग, एक भाजपाची गँग, तिसरी गँग दिसतच नाही, पण ती आहे कारण ती ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्यात अडकली आहे. त्यामुळे त्या गँगला डोकं वर काढता येत नाही. हे गँगवॉर जर सरकारमध्ये होणार असेल तर मोदीजींना सांगायचं आहे की तुम्ही भाजपाच संपवला आहात. अशा पद्धतीने सावंतवाडीच्या भाषणात उद्धव ठाकरेंनी टीकेची तोफ डागली आहे.

## इथून पुढे माझ्या विचारांचा खासदार, अजित पवारांनी बारामतीत रणशिंग फुंकले

पुणे : लोकसभा निवडणूक अवघ्या काही महिन्यांवर येऊन ठेपली आहे. त्यामुळे सर्वच पक्षांकडून जाहीर सभांना सुरुवात झाली आहे. देशपातळीवर इंडिया आघाडी विरुद्ध भाजपाप्रणित एनडीए (राष्ट्रीय लोकशाही आघाडी) अशी ही लढत रंगणार आहे. परंतु, या दोन्ही आघाड्यांमध्ये अनेक पक्ष असल्यामुळे जागावाटपाचा तिढा निर्माण झाला आहे. हा तिढा सुटल्यावर जागावाटप होईल. त्यामुळे आगामी निवडणुकीत कोणत्या पक्षाला किती जागा मिळतात याकडे सर्वांचं लक्ष लागून आहे. दरम्यान, मी जिथं उमेदवार जाहीर करेन, तिथं मीच उभा आहे असं समजून मतदान करा, असं आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं. आज (४ फेब्रुवारी) ते बारामतीत बोलत होते.

अजित पवार यांनी बारामती लोकसभा मतदारसंघावर लक्ष केंद्रीत केलं आहे. आज सकाळपासूनच त्यांनी बारामतीत अनेक कार्यक्रमांना हजेरी लावली. अजित पवार यांनी



दुपारी बारामतीत त्यांच्या पक्षाच्या जनसंपर्क कार्यालयाचं उद्घाटन केलं. त्यापाठोपाठ बारामतीत व्यापाऱ्यांचा मेळावा घेतला. या दोन्ही कार्यक्रमांमध्ये बोलताना त्यांनी बारामती लोकसभेत त्यांच्या पक्षाचा (अजित पवार गट) खासदार निवडून आणण्यावर भाष्य केलं. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार गटातील नेत्या सुप्रिया सुळे या बारामतीच्या खासदार आहेत. त्यामुळे अजित पवार हे सध्या सुप्रिया सुळेंविरोधात बारामती मतदारसंघात सक्रीय झाले आहेत. बारामतीत पक्षाच्या कार्यालयाचं उद्घाटन केल्यानंतर उपस्थितांशी संवाद साधताना अजित पवार म्हणाले, आगामी काळात तुम्ही फार मोठ्या गंभीर समस्येतून जाणार आहात. एकीकडे आमचे वरिष्ठ सांगतायत असं करा, दुसरीकडे अजित सांगतोय तसं करा, अशा वेळी कोणाचं ऐकायचं असा प्रश्न तुमच्यासमोर निर्माण होईल. त्यामुळे माझी तुम्हा सर्वांना एवढीच विनंती आहे की, इतके दिवस तुम्ही आमच्या वरिष्ठांचं ऐकलंत, आता माझं ऐका. इथून पुढे माझ्या विचारांचा खासदार झाला तर काय होणार आहे? मी तुम्हाला खोटं सांगत नाही, परंतु, माझे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्याशी चांगले संबंध आहेत.

अजित पवार उपस्थितांना म्हणाले, माझी तुम्हाला विनंती आहे की लोकसभेची निवडणूक आधी येणार आहे. त्या निवडणुकीत तुम्हाला मला पावती द्यायची असेल तर बारामतीत जो बदल आणि जे काही काम चाललं आहे, मी विकासासाठी जे निर्णय घेतलेत ते लक्षात ठेवा. धाडस दाखवल्यावरच कामं होत असतात, हे लक्षात ठेवा.

# अमळनेर येथील तत्त्वज्ञान केंद्र पुनर्विकास प्रस्तावाचा सकारात्मक विचार केला जाईल : मुख्यमंत्री

## ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा समारोप

जळगाव : अमळनेर येथे शंभर वर्ष जूने तत्त्वज्ञान केंद्र आहे. त्याच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव शासनाकडे आल्यास त्याचा सकारात्मक विचार केला जाईल, अशी ग्वाही राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिली. ते मुंबई येथून दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून संमेलनात सहभागी झाले होते. यावेळी संवाद साधतांना मराठी लोक साहित्याच्या संशोधन व ग्रंथ लेखनासाठी विशेष अनुदान देणार असल्याची, माहितीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अमळनेर मराठी वाड्.मय मंडळाच्या वतीने आयोजित ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा येथील प्रताप महाविद्यालयाच्या मैदानावर आज समारोप झाला. समारोप सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी संमेलनाध्यक्ष प्रा.डॉ.रवींद्र शोभणे उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, शालेय शिक्षण व मराठी भाषा विकासमंत्री दिपक केसरकर, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, संमेलनाचे निमंत्रक तथा मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, खासदार उन्मेष पाटील, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या कार्यवाह उज्ज्वला मेहेंदळे, साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे, संमेलनाचे कार्याध्यक्ष डॉ.अविनाश जोशी, पुणे विद्यापीठ सिनेट कौन्सिल सदस्य राजेश पांडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

दृकश्राव्य ऑनलाईन भाषणात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, शासन महाराष्ट्रातील प्रत्येक शिक्षणबाह्य शासकीय, खासगी कार्यालयांमध्ये ग्रंथालय सुरू करण्याबाबत पावले उचलली आहेत. थोर साहित्यिकांच्या, संतांच्या तसेच ज्ञात अज्ञात लोकांनी लिहिलेल्या दुर्मिळ हस्तलिखितांच्या जतनासाठी विशेष प्रयत्न करून त्याबाबत प्रस्ताव मागविण्यात येणार आहे. जिल्ह्याच्या ठिकाणी साहित्य संस्कृती मंडळाच्या माध्यमातून साहित्य संस्कृती भवन उभे करण्याची संकल्पना आहे. ज्याद्वारे जिल्ह्यातील साहित्याचा, कलेचा प्रचार प्रसाराला एक व्यासपीठ मिळेल. प्रकाशन व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाकडून सर्वतोपरी मदत केली जाईल. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी ग्रंथयात्रा अर्थात ग्रंथ प्रदर्शन भरविण्यासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे.

साहित्य संमेलन ही आपली थोर परंपरा आहे. सांस्कृतिक विचारांची ही गंगा अखंड वाहते आहे. शंभराव्या साहित्य संमेलनाकडे वाटचाल करतो आहोत. १०० वे साहित्य संमेलन हे जागतिक स्तरावर नावाजले जाईल एवढ्या मोठ्या प्रमाणावर ते आयोजित केले गेले पाहिजे. महाराष्ट्र शासन १०० व्या साहित्य संमेलनातही सर्वोतोपरी सहकार्य करेल अशी ग्वाही ही




मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले की, आपल्या समाजात साहित्यिकांचे स्थान हे कायम आदराचे व पूजनीय राहिले आहे. तरूण पिढीतही आता दमदार लिहिणारे लेखक तयार होत आहेत. साहित्य हा महाराष्ट्राचा वैचारिक प्रवाह आहे. केवळ तलवारी घेऊन लढाया करण्यापुरती आपली ओळख मर्यादित नाही. तर लेखणी घेऊन वैचारिकतेचं अधिष्ठान कागदावर मांडणारी अशी ही ओळख आहे. खान्देशात हा साहित्य सोहळा साजरा होत असतांना मराठी भाषेविषयी बोलतांन । पान २ वर

## १९ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान मुंबईत

मुंबई : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदींचे राज्यातील दौरे वाढले आहेत. येत्या १९ फेब्रुवारीला शिवजयंतीच्या मुहुर्तावर पंतप्रधान मुंबईत येणार असून, या दिवशी ते मुंबईच्या महत्त्वाकांक्षी



कोस्टल रोड प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन करणार आहेत. हा पहिला टप्पा वरळी ते मरीन ड्राईव्हपर्यंत १० किलोमीटरचा आहे. निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून काम पूर्ण न झालेला कोस्टल रोड सुरू करत असल्याबद्दल ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी सरकारवर टीका केली आहे. मुंबईचा ड्रीम प्रोजेक्ट असलेला कोस्टल रोड अंतिम टप्प्यात आला असून, त्याचा पहिला टप्पा १९ फेब्रुवारीला सुरू होत आहे.

पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते कोस्टल रोडचे उद्घाटन होणार आहे. कोस्टल रोडमुळे मुंबईकरांना वाहतुकीपासून दिलासा मिळणार आहे. १० किलोमीटरहून अधिकचा प्रवास अवघ्या १०-१२ मिनिटांत करता येईल. कोस्टल रोडची एकूण लांबी २९.२ किलोमिटर असून त्याचे काम दोन टप्प्यात केले जात आहे. संपूर्ण कोस्टल रोड तयार झाल्यानंतर ३० ते ४० मिनिटांचा वेळ वाचणार आहे. पहिल्या टप्प्यात १०.५८ किलोमीटरचा पूल, तर २.४ किमी लांबीचा सागरी बोगदा बांधण्यात आला आहे. दरम्यान, उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी कोस्टल रोडवरून राज्य तसेच । पान २ वर

## राजीनामा मंजूर होत नसल्याने मंत्री म्हणून काम; छगन भुजबळ यांचा दावा

नाशिक : राजीनामा मंजूर होत नाही, तोपर्यंत काम करावेच लागेल. फाईलींवर स्वाक्षरी करावी लागेल, अशी अपरिहार्यता राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केली. खासदार संजय राऊत यांच्यासह अन्य पक्षातील काही नेते भुजबळांचा राजीनामा हे एक नाटक आहे, ते सरकारी लाभ घेत असल्याची टीका करत आहेत.



यावर भुजबळ यांनी, कुणाला काय बोलायचे ते बोलू द्या, आपला राजीनामा मुख्यमंत्र्यांकडे असल्याचा पुनरुच्चार केला. आपण आपल्या वाहनातून फिरत असून कार्यकर्त्यांच्या खर्चातून जाहीर सभा होत असल्याचा दावा त्यांनी केला. मंत्रिमंडळात कुणाला ठेवायचे, कुणाला काढायचे, याचा निर्णय सर्वस्वी मुख्यमंत्री घेतात. त्यानुसार राज्यपालांना कळवतात, असे त्यांनी स्पष्ट केले अंबडच्या सभेला जाण्याआधी आपण राजीनामा मुख्यमंत्र्यांच्या नावाने लिहून उपमुख्यमंत्री अजित पवार । पान २ वर

### पाकिस्तानला पुरविली गुप्त माहिती

## भारतीय दूतावासातील कर्मचारी सत्येंद्र सिवल हनी ट्रॅपच्या जाळ्यात

नवी दिल्ली : उत्तर प्रदेशमधील दहशतवादी विरोधी पथकाने भारतीय परराष्ट्र मंत्रालयाच्या एका कर्मचाऱ्याला उत्तर प्रदेशच्या मेरठ येथे अटक केली आहे. हा कर्मचारी रशियाची राजधानी मॉस्कोमधील भारतीय दूतावास कार्यालयात कार्यरत असताना त्याने पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेसाठी काम केले, असा आरोप त्यावर ठेवण्यात आला आहे. सत्येंद्र सिवल असे नाव असलेल्या कर्मचाऱ्याने २०२१ साली मॉस्कोमधील दूतावासात काम केले होते. सत्येंद्र सिवलने भारतीय लष्कर आणि काही गुप्त धोरणांची माहिती पाकिस्तानला दिली, असे चौकशीतून समोर आले आहे.पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेने सत्येंद्र सिवलला हनी ट्रॅपच्या माध्यमातून जाळ्यात ओढले, असे सांगितले जाते. त्यानंतर पाकिस्तानच्या इशाऱ्यावर त्याने भारताशी निगडित गुप्त माहिती फोडण्याचे काम केले. एवढेच नाही तर सत्येंद्र सिवल इतर कर्मचाऱ्यांनाही या हेरगिरीच्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करत होता. उत्तर प्रदेश एटीएससह आता केंद्रीय तपास यंत्रणाही सत्येंद्र सिवलची चौकशी करत आहेत. या चौकशीतून आणखी माहिती बाहेर । पान २ वर

## नागपूर जिल्ह्यासाठी आऊटर रिंग रोड 'लाईफलाईन' ठरेल : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर : नागपूरचा वाढता व्याप पाहता नवीन रिंग रोड लाईफलाईन ठरणार आहे. जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला या मार्गामुळे चालना मिळेल. येत्या काळात या रिंग रोडमुळे जिल्ह्यातील अर्थव्यवस्था १ लाख कोटींची होईल, असा विश्र्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला.



केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत ८५६.७४ कोटी रुपये खर्चून बांधलेल्या ३३.५० किलोमीटरच्या आऊटर रिंग रोडच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण आज डिजिटल पद्धतीने करण्यात आले. आर. आर. आर. लॉन, हिंगणा रोड येथे या लोकार्पण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट (जामठा) पासून हा मार्ग सुरू होऊन फेटरी (काटोल रोड) पर्यंत असेल. केंद्र सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकल्प पूर्ण करण्यात आला आहे.लोकार्पण प्रसंगी खासदार कृपाल तुमाने, आ. समीर मेघे, आ. मोहन मते, परिणय फुके यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

नागपूर शहर हे महाराष्ट्रातील व्यापार आणि वाणिज्यचे प्रमुख केंद्र आहे. नागपूर शहराचे भारताच्या औद्योगिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान आहे. शहरातील बाह्यवळण मार्ग प्रकल्पाचा उद्देश नागपुरातील मालवाहतूक आणि कनेक्टिव्हिटीमध्ये सुधारणा करणे हा आहे. सर्वसामान्य जनता, शेतकरी आणि व्यावसायिकांना याचा फायदा होईल. शहरामधील जड वाहतुकीची गर्दी कमी होऊन अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, गुंतवणूक वाढेल असे उपमुख्यमंत्री म्हणाले.राज्यातील सर्व महत्त्वाची देवस्थाने शक्तीपीठाच्या माध्यमातून जोडली जाणार आहेत. नागपूर ते गोवा असा हा शक्तीपीठाचा मार्ग असेल. लवकरच या मार्गाचे काम सुरू होणार असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. । पान २ वर

## संपादकीय

### ‘तेल’ कोणते ओतणार..

देशभरातील ५६ राज्यसभा सदस्य निवृत्त होत असून येत्या २७ फेब्रुवारी रोजी ही निवडणूक होणार आहे. विरोधकांनी ‘इंडिया’ ही आघाडीदेखील स्थापन केली आहे. पण लोकसभा निवडणुकांचा बिगुल वाजायच्या आतच एकेकाने यातून काढता पाय घेतला आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी केंद्रातील भाजपला धूळ चारण्याचा विडा उचलला होता. त्यासाठी मोदी विरोधकांनी एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी केले होते. त्यासाठी पहिली बैठक त्यांनी बिहारमध्ये घेतली होती. अशी जय्यत तयारी सुरू असताना अचानक त्यांनी भाजपच्या तंबूत शिरून सगळ्यांना आश्‍चर्याचा धक्का दिला. तृणमूल काँग्रेस आणि आम आदमी हे इंडिया आघाडीतून बाहेर पडतील हे अपेक्षितच होते. दोघांनी ‘स्वबळा’चा दिलेला नारा हा कोणालाही अचंबित करणारा नव्हता, पण आता प्रत्यक्षात निवडणूक प्रक्रियेला जेव्हा सुरुवात होईल तेव्हा ही आघाडी राहते का? राहिलीच तर या आघाडीत नक्की किती पक्ष असतील हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार आणि वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांच्यातील मतभेद सर्वश्रुत आहेत. पण मतविभागणी टाळण्यासाठी राष्ट्रवादीने वंचित आघाडीला सोबत घेण्याची तयारी दर्शवली आहे. काँग्रेसच्या दृष्टीने वंचित आघाडीच अडचणीची ठरली आहे. काँग्रेसने वंचित आघाडीला कायम भाजपची ‘बी’ टीम म्हणून हिणवले आहे. २०१९ च्या निवडणुकीनंतर ही टीका अधिकच तीव्र झाली होती. काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेवरही आंबेडकर यांनी टीका केली होती. २०१९ च्याच लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये दोन्ही काँग्रेसची आघाडी होती. लोकसभा निवडणुकीत काँग्रेस आघाडीचे सुमारे १५ उमेदवार, तर विधानसभा निवडणुकीत ३२ उमेदवार पराभूत झाले. आताही घोडे अडले आहे ते काँग्रेसच्या पत्रावर. शिवाय केंद्रातील भाजपला हरवण्याला सर्वोच्च प्राधान्य असल्याने कोणताही अहंम बाळगणार नाही, असे सांगणाऱ्या वंचितने महाविकास आघाडीसमोर आणखी काही अटी ठेवल्या आहेत. त्यांना प्रामुख्याने प्रत्येक पक्षाचा काय अजेंडा आहे? तूर्तास जागावाटपाचे सूत्र काय आहे? किमान समान कार्यक्रम काय असेल हे जाणून घ्यायचे आहे. वंचितला नाममात्र सहभाग नकोय. एकूणच वंचितच्या दिव्याच्या प्रकाशात महाविकास आघाडीच्या विजयाची वाट उजळण्याची शक्यता असली तरी काँग्रेस त्यात ‘तेल’ कोणते ओतणार यावर सर्व अवलंबून आहे.

# कोल्हापूरची ऐतिहासिक, सांस्कृतिक परंपरा महासंस्कृती महोत्सवातून सर्वदूर जाईल : पालकमंत्री हसन मुश्रीफ

कोल्हापूर : राज्य शासन आणि जिल्हा प्रशासनाच्या वतीने आयोजित केलेल्या शाहू मिल येथील महासंस्कृती महोत्सव २०२४ मधून कोल्हापूर जिल्ह्याला लाभलेली ऐतिहासिक, सांस्कृतिक परंपरा सर्वदूर जाईल असे प्रतिपादन पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी केले. महासंस्कृती महोत्सव ३१ जानेवारी पासून कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता याची सांगता रविवारी सायंकाळी झाली. यावेळी ते म्हणाले, पाच दिवसीय सांस्कृतिक कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी झाली. यात शिवकालीन शस्त्र, हस्तकला, खाद्य संस्कृती आणि अनेक दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमातून महोत्सव अंमलबजावणीचा उद्देश यशस्वी झाला. तसेच पालकमंत्री मुश्रीफ यांनी ऐतिहासिक शस्र प्रदर्शनालाही यावेळी भेट दिली. यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे, महानगरपालिका आयुक्त के. मंजुलक्ष्मी, अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त केशव जाधव, उपजिल्हाधिकारी संपत खिलारी, उपविभागीय अधिकारी हरीश धार्मिक, तहसिलदार स्वप्नील रावडे यांचेसह इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी समारोपीय कार्यक्रमात पालकमंत्री मुश्रीफ म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज आणि शाहू महाराज यांनी जनतेचं, रयतेचं राज्य राबवून समाजातील प्रत्येकाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच आजही आपण त्यांच्या पालख्या अभिमानाने वाहतो. त्यांच्या पदपावनस्पर्शाने पावन झालेल्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक भूमीतील वारसा अशा सांस्कृतिक महोत्सवातून पुढील पिढीकडे जायला हवा. कोल्हापूर जिल्ह्याला अगळं वेगळं ऐतिहासिक महत्त्व आहे. येथील श्री.अंबाबाई, दख्खनचा राजा, दत्त महाराज, खिद्रापूर, अदमापुर अशा अनेक तीर्थक्षेत्रांतून ऐतिहासिक महत्त्व आजही सर्वदूर आहे. शाहू महाराजांनी शेतकरी, महिला, विद्यार्थी यांच्यासाठी अनेक योजना राबविल्या. खऱ्या अर्थाने रयतेचं राज्य निर्माण केलं. अशा या थोर श्री शाहू छत्रपती महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक याच शाहू मिल येथे येत्या काळात पूर्ण करू. यासाठी वस्त्रोद्योग विभागाकडे जागेसाठी पाठपूरवा करून जागा हस्तांतरित केली जाईल असे ते पुढे म्हणाले.



जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. ते म्हणाले, राज्य शासन आणि जिल्हा प्रशासन यात सर्वच शासकीय विभागांनी योगदान देऊन हा कार्यक्रम यशस्वी केला. अशा प्रकारच्या कार्यक्रमातून आपली परंपरा, आपली संस्कृती पुढील पिढीकडे जाते. असे कार्यक्रम पुन्हा पुन्हा राबविण्यासाठी राज्य शासन व जिल्हा प्रशासन भविष्यातही प्रयत्न करेल. शाहू मिल येथे कलाकार, कारागीर यांनी आपली संस्कृती, आपली हस्तकला आपल्या कलेतून सर्वांसमोर मांडली. कार्यक्रमाचे आभार उपजिल्हाधिकारी संपत खिलारी यांनी मानले. तसेच यावेळी महोत्सवाचे आयोजन करण्यासाठी नेमलेल्या अधिकारी कर्मचारी व अशासकीय सदस्यांना सन्मानित करण्यात आले. यामध्ये उपविभागीय अधिकारी हरीश धार्मिक, तहसीलदार स्वप्नील रावडे, प्रमोद पाटील, प्रसाद संकपाळ, ऋषिकेश केसकर, चंद्रकांत पाटील, शेखर वळीवडेकर, तेजस खैरमोडे, निरांत, गजानन, अनिकेत, उदय पाटील आदी जणांचा समावेश होता.

स्वराज्य संस्थापक श्रीमंतयोगी कार्यक्रमाने सांगता

समारोपीय कार्यक्रमात रविवारी स्वराज्य संस्थापक श्रीमंतयोगी या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गौरवशाली इतिहासावर आधारित कार्यक्रमाने सांगता झाली. यावेळी सुट्टीच्या दिवसामुळे प्रचंड गर्दीत कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमात वेगवेगळ्या प्रसंगात सादर केलेली कला, संगीत व दमदार आवाज यातून उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटाने दाद दिली. तसेच प्रदर्शनीय कलादालनात नागरिकांनी ऐतिहासिक व सांस्कृतिक प्रदर्शनाचा लाभ घेतला.

पान १ वरुन

### अमळनेर येथील तत्त्वज्ञान केंद्र ..

ा आपण केवळ प्रमाण भाषेचा विचार करुन चालणार नाही. मराठी भाषेत आपले वेगळे स्थान निर्माण करणारी आणि या परिसरातील अहिराणी, तावडी या बोलीभाषा तसेच वऱ्हाडी अन्य अशा आपल्या विविध भागातील बोलीभाषा आपल्या मायमराठीला श्रीमंत करतात हे ध्यानात घ्यावे लागेल. आज मराठी सोबतच अहिराणी भाषेतील गाणी समाज माध्यमांवरून जगभर पोहचली आहेत. त्यांना लोकप्रियताही मिळत आहे. याचे कारण म्हणजे आपल्या या बोलीभाषेतील गोडवा हा आहे. बोलीभाषांचा हा गोडवा प्रमाणभाषेच्या आणि इंग्रजीच्या अवास्तव आग्रहामुळे संपून जाऊ नये यावर यानिमित्ताने विचार व्हायला हवा. असे मतही त्यांनी यावेळी व्यक्त केले.

शालेय शिक्षणमंत्री दिपक केसरकर म्हणाले की, विदर्भातील साहित्य मंडळाला दहा कोटी रूपये देण्यात येणार आहेत. राज्यात प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात छोटी- छोटी संमेलने झाली पाहिजेत. वेगवेगळी संमेलन न भरविता सर्वांनी एकाच व्यासपीठावर राहणे गरजेचे आहे. मराठी भाषेच्या विकासासाठी जे जे काही करता येईल. ते करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. परदेशात व भारतातील इतर राज्यातील मराठी शाळांच्या संवर्धनासाठी शासन काम करत आहे. साहित्य संमेलन हे शिखर संमेलन झाले पाहिजे. जिल्ह्यातील साहित्य संमेलनासाठी आवश्यक तेवढा निधी देण्यास शासन कटीबद्ध आहे. अमळनेरला पुस्तकाचे गाव करण्यात करण्यात येईल. साने गुरुजींना भारतरत्न पुरस्काराचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात येईल. नियतकालिकांसाठी आवश्यक निधी साहित्य महामंडळांना देण्यात येईल. मराठी साहित्यिक व भाषिकांशी संवाद साधण्यासाठी वॉररूम तयार केला जाईल. या वर्षी कोणत्याही परिस्थितीत मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून दिला जाईल. असेही त्यांनी सांगितले.

उपसभापती डॉ नीलम गोऱ्हे म्हणाल्या की, सार्वजनिक जीवनात आपल्या बोली भाषेत सातत्याने बोलणे आवश्यक आहे. केंद्र शासनाकडून महाराष्ट्रातील ग्रंथालयांच्या विकासासाठी ४७० कोटी रूपये दिले जाणार आहेत. आतापर्यंत विधानसभेत ६७ वेळा व विधानपरिषदेत ७० वेळा मराठी भाषेविषयी चर्चा झाल्या. वेगवेगळ्या माध्यमातील शाळांमध्ये मराठी भाषा अनिवार्य करण्यात आली आहे.

संमेलनाध्यक्ष डॉ.रवींद्र शोभणे म्हणाले की, अभिव्यक्ती स्वातंत्र्य देण्याची आपली परंपरा आहे. मात्र ही परंपरा सध्या लयाला जात आहे. अमळनेर व खान्देशच्या मातीतील माणसात एक सहृदयता आहे. प्रत्येकाला संमेलनाध्यक्ष सोबत फोटो काढण्याची भावना अतिशय महत्त्वाची आहे. आपले लक्ष आता शंभराव्या मराठी साहित्य संमेलनाकडे लागले आहे. उषा तांबे म्हणाल्या की, पुढील संमेलनासाठी ३१ मार्च २०२४ पर्यंत अर्ज स्वीकारण्यात येतील. त्यात छाननी केल्यानंतर २०२५ च्या संमेलनाचा निर्णय घेण्यात येईल.

महाराष्ट्राच्या विकासावर बारीक लक्ष ठेवता ठेवता डोळ्यावर थोडा ताण पडल्याने डोळ्यांची दुरूस्ती करून घेतली. त्यामुळे इच्छा असून देखील प्रत्यक्षात याठिकाणी येता आले नाही, या बद्दल दिलगिरी व्यक्त करतो. खरे तर सारस्वतांच्या मेळ्याला मुख्यमंत्र्यांनी भेट देण्याची प्रथा, परंपरा आणि संस्कृती आहे याची जाणीव आहे. परंतु यावेळी नाईलाज झाला, अशी भावना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी लेखक, प्रकाशकांचा अमळनेर साहित्य संमेलन आयोजकांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

### राजीनामा मंजूर होत नसल्याने

यांच्याकडे दिला होता. सभेला जाताना त्याबाबत वाच्यता करू नका, असा निरोप दिला गेला. नंतर मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी आपणास बोलावून घेतले. सर्वांनी ओबीसींबाबत मत मांडायला आमचा विरोध नाही, शांतपणे मत मांडावे, राजीनाम्याची वाच्यता करू नये, असे सांगितले होते. त्यामुळे अडीच महिने आपण वाच्यता केली नाही. परंतु, नंतर एक जण बोलला की, कंबरेत लाथा घाला आणि बाहेर काढा. त्यानंतर राजीनाम्याची वाच्यता केल्याचे त्यांनी सांगितले.

### नागपूर जिल्ह्यासाठी आऊटर रिंग रोड..

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, रस्ते, पाणी, दळणवळणाची साधने आणि वीज या चार बाबी विकासासाठी महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे विकासाला गती मिळते, गुंतवणूक वाढते, उद्योग येतात आणि रोजगार निर्माण होऊन गरिबी दूर होण्यास मदत होते. हिंगणा आणि बुटीबोरीमध्ये एमआयडीसी आल्यानंतर या भागाचा विकास झाला. हिंगण्याला स्मार्ट सिटी अशी ओळख मिळवून द्यायची आहे. नवीन रिंगरोडमुळे विकासाला अधिक गती प्राप्त होणार आहे. एअरपोर्ट स्टेशनपासून रिंगरोडच्या सुरुवातीपर्यंत आणि पुढे बुटीबोरीपर्यंतचा रस्ता हा सहापदरी होणार आहे. तसेच वाडीपासून कोंढाळीपर्यंत देखील सहापदरी रस्त्याचे काम सुरू होणार असल्याची माहिती केंद्रीय मंत्री श्री. गडकरी यांनी दिली. रामटेकचे खासदार कृपाल तुमाणे, हिंगणा येथील आमदार समीर मेघे यांनी आऊटर रिंग रोडचे लोकार्पण झाल्याबद्दल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आभार मानले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाचे मुख्य महाव्यवस्थापक (तांत्रिक) अनिल कुमार शर्मा यांनी केले. सूत्रसंचालन रेणुका देशकर यांनी तर आभार डॉ. अरविंद काळे यांनी मानले.

### भारतीय दूतावासातील कर्मचारी

येण्याची शक्यता आहे.

एटीएसच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मॉस्कोमध्ये तैनात असताना सत्येंद्र सिवल फेसबुकच्या माध्यमातून एका महिलेच्या संपर्कात आला. तिथून मेसेंजरच्या माध्यमातून त्यांच्यात संवाद सुरू झाला. त्यानंतर मोबाइल नंबर एकमेकांना देऊन व्हॉट्सअपवर त्यांचे बोलणे होऊ लागले. हनी ट्रॅप करणाऱ्या महिलेने स्वतःला रिसर्चर असल्याचे सांगून सिवलकडून दूतावासातील माहिती मिळवली. या गुप्त माहितीच्या बदल्यात पैशांचेही आमिष सिवलला दाखविण्यात आल्याचे चौकशीतून समोर आले आहे.

उत्तर प्रदेश एटीएसच्या अधिकाऱ्यांनी पुढे सांगितले, पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयचे गुप्तचर त्यांच्या हस्तकांमार्फत भारतीय परराष्ट्र मंत्रालयातर्फे दूतावासात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पैशांचे आमिष देऊन भारतीय लष्कर आणि गुप्त धोरणांची माहिती मिळविण्याचा प्रयत्न करत आहेत, अशी गुप्तवार्ता खात्रीलायक सूत्राकडून मिळाली. या माहितीच्या आधारे एटीएसने तपास सुरू केला. इलेक्ट्रॉनिक सर्व्हेलन्स करून आणि पुरावे गोळा केल्यानंतर सत्येंद्र सिवलचा माग काढण्यात आला. सिवल हा उत्तर प्रदेशच्या हपूर जिल्ह्यातील रहिवासी असून तो परराष्ट्र मंत्रालयातील बहुउद्देशिय कर्मचारी विभागात काम करतो.ट

### १९ फेब्रुवारी रोजी पंतप्रधाने

केंद्र सरकारवर टीका केली आहे. ‘कोस्टल रोड आणि मुंबईशी अजिबात देणे-घेणे नसलेल्या महाराष्ट्राची सत्ता बेकायदेशीररीत्या बळकावणारे आणि मुंबईची लूट करणारे राजकारणी या अर्धवट काम राहिलेल्या कोस्टल रोडचे उद्घाटन करून निवडणुकीत श्रेय घेऊ पाहतील. काम पूर्ण न झालेला कोस्टल रोड सुरू करणे ही अत्यंत चुकीची गोष्ट ठरेल. पण राजकारणच करू पाहणाऱ्यांकडून दुसरी तरी काय अपेक्षा करणार? मुंबईचा वापर राजकारणासाठी केला

# शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी ‘मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा’ अभियान

विद्यार्थीदशेत शिक्षणासोबत स्वच्छतेची गोडी लागल्यास स्वच्छता ही विद्यार्थ्याच्या आयुष्याचा भाग बनून जाते. शाळा स्वच्छतेच्या कार्यात त्यांना सकारात्मकपणे सहभागी करुन शिक्षण आनंददायी, प्रेरणादायी वातावरण निर्मिती होण्यासह वैयक्तिक स्वच्छतेची सवय जडते. राज्य शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत ‘मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा’ अभियान राबविण्याचा निर्णय घेतल्याने विद्यार्थीदशेतच स्वच्छतेचे संस्कार होण्यास मदत होणार आहे.



राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या व सर्व माध्यमांच्या शाळांमधील शिक्षक, पालक, विद्यार्थी व माजी विद्यार्थी यांच्यात शाळेप्रती उत्तरदायित्वाची भावना निर्माण व्हावी यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून हे अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे अभियान सद्यस्थितीत राज्यभरात सुरू असून १५ फेब्रुवारीपर्यंत राबविण्यात येत आहे. पुणे जिल्ह्यातील सर्व शाळांना या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.

राज्यात २०२०-२१ पासून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा ही राज्य शासन पुरस्कृत योजना राबविण्यात येते. भौतिक सुविधांचे निर्माण, शैक्षणिक गुणवत्तेतील वाढ व प्रशासकीय सुधारणा अशी प्रमुख क्षेत्रे या योजनेसाठी निश्र्चित करण्यात आली असून पहिल्या टप्प्यात ४७८ शाळांचा समावेश या योजनेत करण्यात आला आहे. ही योजना शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांसाठी राबविण्यात येते. या योजनेतील घटकांची अंमलबजावणी परिणामकारकरित्या व्हावी म्हणून या अभियानाची सुरूवात करण्यात आली आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत आतापर्यंत केवळ भौतिक सुविधांचे निर्माण या घटकांतर्गत लहान बांधकामे व मोठी बांधकामे याच बाबींकडे लक्ष देण्यात आले होते. या अभियानाचा अधिक प्रभावी विस्तार होण्याच्यादृष्टीने विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता विकसित करण्यासोबतच अध्ययन, अध्यापन, प्रशासन यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पर्यावरण संवर्धनाची जाणीव, सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छता, चांगले आरोग्य, राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृद्धिंगत करण्यासाठीचे प्रयत्न, व्यवसाय शिक्षणाची तोंडओळख, अंगभूत कला-क्रीडा गुणांचा विकास इत्यादी अशा अनेकविध घटकांचा व उद्दिष्टांचा अंतर्भाव होणे आवश्यक असल्याने शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी ‘मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा’ हे स्पर्धात्मक अभियान फायदेशीर ठरेल.

राज्यातून कचऱ्याबाबतच्या निष्काळजीपणाची सवय मोडून काढणे, राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय एकात्मता याबाबत विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे, विशिष्ट कौशल्य आत्मसात करण्यासाठी विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाचे महत्व पटवून देणे, विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण करणे, शाळेचे शिक्षक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी व पालक यांच्यात शाळेविषयी कृतज्ञतेची व उत्तरदायित्वाची भावना निर्माण करणे हीदेखील अभियानाची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

या अभियानासाठी शाळांची विभागणी शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा आणि उर्वरित इतर सर्व व्यवस्थापनांच्या शाळा अशा दोन वर्गवारीत करण्यात आली आहेत. प्रत्येक स्तरावरील विजेता या दोन्ही वर्गवारीसाठी स्वतंत्रपणे निवडण्यात येईल. हे अभियान बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्र, वर्ग अ व वर्ग ब च्या महानगरपालिकांचे कार्यक्षेत्र तसेच उर्वरित महाराष्ट्र अशा तीन स्तरांवर राबविण्यात येत आहे.

अभियानात सहभागी होऊन एकमेकांशी स्पर्धा करणाऱ्या शाळांना विद्यार्थीकेंद्रीत उपक्रमांचे आयोजन व त्यातील विद्यार्थ्यांच्या सहभागासाठी एकूण ६० गुण तर शाळा व्यवस्थापनाकडून आयोजित उपक्रम व त्यातील विविध घटकांचा सहभागाकरिता एकूण ४० गुण असतील. अभियानात सहभागी शाळांचे तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावरील गठीत समित्या शाळांच्या कामगिरीच्या आधारे मुल्यांकन करतील.

बृहन्मुंबई महानगरपालिका व वर्ग ‘अ’ व वर्ग ‘ब’ च्या महानगरपालिकांच्या कार्यक्षेत्रातील शाळांना पहिले २१ लाख, दुसरे ११ लाख व तिसरे पारितोषिक ७ लाख रूपयांचे असेल. उर्वरित महाराष्ट्रात तालुकास्तरावर पहिले ३ लाख, दुसरे २ लाख, तिसरे १ लाख रुपये, जिल्हास्तरावर पहिले ११ लाख, दुसरे ५ लाख, तिसरे ३ लाख तर ८ विभागीय



स्तरावर पहिले २१ लाख, दुसरे ११ लाख, तिसरे ७ लाख रूपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका व वर्ग ‘अ’ व वर्ग ‘ब’ च्या महानगरपालिका तसेच उर्वरित महाराष्ट्रातील प्रत्येक विभागातील प्रथम क्रमांकाच्या शाळा एकमेकांशी स्पर्धा करुन करतील आणि त्यातून दोन्ही वर्गवारीसाठी राज्यस्तरीय प्रथम तीन क्रमांक निवडण्यात येतील.

या अभियानात सहभागी होण्यासाठी पुणे जिल्ह्यातील शाळांनी सरल प्रणालीतील स्कूल पोर्टलमधील लिंक-https://student.maharashtra.gov.in/stud db/users/login या संकेतस्थळावर माहिती भरावी. अभियानात सहभागी होत बक्षिसे जिंकावीत आणि शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी त्याचा उपयोग करुन घ्यावा, असे आवाहन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शिक्षण आयुक्तालय आणि जिल्हा परिषद शिक्षण विभाग प्रशासनाने केले आहे.

**–संकलन, जिल्हा माहिती कार्यालय, पुणे**



हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# नळदुर्ग येथे दलित वस्तीत घाणीचे साम्राज्य लहान मुलांसह नागरिकांचे आरोग्य धोक्यात

धनकचरा व्यवस्थापन झोपी गेलीयं का? नागरीकांची हाक; सफाई कामगारांना शासन नियमा प्रमाणे रोजगार उपलब्ध व्हावा

## घनकचरा व्यवस्थापन ही नळदुर्ग शहराला लागलेली किड

नळदुर्ग /दादासाहेब बनसोडे :नळदुर्ग शहर एक ऐतिहासिक शहर म्हणून महाराष्ट्रामध्ये चांगलीच ओळख आहे या शहरांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात दलित वस्तीत म्हणजे बुद्धनगर , भीमनगर , डॉ आंबेडकर नगर , मधील नागरिकां सह लहान मुलांचे आरोग्य धोक्यात आले आहे .

गेल्या पंधरा ते वीस दिवस झाली कोणते ही सफाई कामगार किंवा व्यवस्थापन या वस्तीत फिरकले सुद्धा नाहीत गटारी तुडंबु भरल्यात परंतु प्रशासन मात्र शांत झोपी गेल आहे की काय ? आस सवाल नागरीकातुन केला जातोय मग हे झोपी गेलेलं प्रशासन केव्हा जागे होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे .




मानवाच्या प्रत्येक कृतीतून तयार होणारा अनेक टाकाऊ पदार्थ आणी कचरा हा टाकाऊ पदार्थ सुद्धा मानवी समाजात घनकचरा व्यवस्थापन ही आर्थिक विकास पर्यावरणाचा ऱ्हास आणि आरोग्याच्या समस्या या दृष्टीने खूप मोठी गंभीर बाब आहे .

हवा पाणी जमीन प्रदूषित होऊन मानवाच्या आरोग्याला धोका निर्माण होतो मग नगरपालिकेची घनकचरा व्यवस्थापन आणि या व्यवस्थापनाचे दुष्परिणाम मानवाच्या जीविताला धोका होणार असल्याचे यावेळी शहरातून बोलले जात आहे

नळदुर्ग शहर स्वच्छ शहर आसे आसताना या शहरांमध्ये पसरलेला घनकचरा हे नळदुर्ग शहराचे सौंदर्य कमी करते हे सर्व कामगार कर्मचारी गावकरी यांनी लक्षात घेतलं पाहिजे या पसरलेल्या ओल्या व सुक्या कच त्यामुळे मानवाच्या आरोग्यास हानिकारक होऊ शकतो कारण घनकचऱ्यामध्ये रोगाचा प्रसार खूप मोठ्या जोराने होत असतो यासाठी घनकचरा व्यवस्थापन आणि घनकचरा व्यवस्थापन चालवणारी कंपनी आणि त्यांचे कर्मचारी झोपी गेलेत का ? असा सवाल नागरिकांतून उठला जातोय .

भीमनगर , बुद्धनगर , आणि डॉ आंबेडकर नगर मधील घनकचरा व्यवस्थापनाचे जे कर्मचारी आहेत ते सफाई कामगार आठ दिवसाला एक सफाई कामगार स्वच्छतेसाठी येत असतो पण गटारी काढल्याच्या नंतर गटारी उचलणारा जो ट्रक्टर आहे तो ट्रक्टर ओला कचरा सुका होई पर्यंत त्याच ठिकाणी लोळत आसतो मग घनकचरा व्यवस्थापन आणी घनकचरा व्यवस्थापनाची माणसं कोणत्या कामाचे फक्त महिन्याचे आलेलं बजेट उचलायचं कर्मचार्यांना देयाचं आणि बाकीचे खिशात टाकायचे हा कंपनीचा त्याचा उद्योग ठरला आहे .



### कंपनीला समाजाचं देणं का घेणं आहे , हा तर त्यांचा धंदा आहे .

घनकचरा वर्गीकरण विघटनशील कचरा आणि अविघटनशील कचरा ,घातक परिणाम आणि अघातक परिणाम यामध्ये वेगळा करून मानवाच्या आरोग्यास धोकादायक ठरू नये अशी प्रक्रिया व्यवस्थापन समितीने केली पाहिजे .

नळदुर्ग शहरात एकूण ५२ कर्मचारी असून यात ७ घंटागाडी आहेत शिवाय दोन ट्रॅक्टर आसताना दलित वस्तीत दुर्लक्ष का ? दलित वस्ती कडे जाणून बुजून दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे मग घनकचरा आरोग्य निरीक्षक कुठे आहेत झोपलेत का ? घनकचरा व्यवस्थापनाकडे सर्वांचे लक्ष वेधले पाहिजे घनकचरा व्यवस्थापन किती गरजेचे आहे आणि त्याची गरज काय आहे हे व्यवस्थापन समितीला समजलं पाहिजे कचरा मुक्त नळदुर्ग शहर करावयाचे असेल तर नळदुर्ग शहराचा दर्जा उंचवायचा आसेल तर नळदुर्ग शहरातल्या प्रत्येक गल्ली बोळातला कचरा ही लांब फेकला पाहिजे केवळ आठ ते दहा दिवसाला जाऊन कुठेतरी खराटा मारणे , कुठली तरी गटार काढणे म्हणजे हे घनकचरा व्यवस्थापनाचे काम नाही घनकचरा व्यवस्थापनाने व्यवस्थापन करायला हवं शहरातला प्रत्येक गल्ली बोळातला कचरा उचललाच पाहिजे आणि त्या कचऱ्याची विल्हेवाट कोणत्या प्रकारे लावावी याचे नियोजन करणे खूप गरजेचे आहे या कचऱ्यामध्ये होणारी रोगराई यावर कशाप्रकारे नियंत्रण आणता येईल याकडे घनकचरा व्यवस्थापन आणि नगरपालिकेच्या वरिष्ठानी जातीने लक्ष घालून या सर्व बाबी लक्षात घेतल्या पाहिजे आणि याचं निवारण केलं पाहिजे या घनकचरा व्यवस्थापना कडे आणी त्या कर्मचाऱ्या कडे लक्ष वेधले पाहिजे आणी त्याना शासनाच्या नियमा प्रमाणे रोजगार दिला पाहिजे व्यवस्थापन समितीने कमीत कमी कचरा कसा करता येईल याकडे सर्वांनी पाहिलं पाहिजे प्रत्येक गल्लीबोळात कचऱ्याची ढिकारे घालणे यामधून लहान लेकरासह नागरिकांच्या आरोग्यास निमंत्रण देणे हा घनकचरा व्यवस्थापनाचा खोडसळपणा कुठेतरी थांबला पाहिजे यामधूनच पर्यावरणाचे संरक्षण करणे आपली सर्वांची जबाबदारी आहे .शहरात घरात कचरा, दवाखाना , सर्व शाळा सार्वजनिक ठिकाणी समाज मंदिर स्वच्छतागृह व्यायाम शाळा मंदिर, मज्जिद , बौद्ध विहार अशा ठिकाणची व्यवस्थापन खूप चांगली असली पाहिजे तरच या मानव जातीच्या आरोग्याची काळजी वाटणार नाही नळदुर्ग शहर स्वच्छ नाही झाले तर नळदुर्ग शहरातील घनकचरा व्यवस्थापन ही शहराला लागलेली कीड आहे.

## बोरेगाव येथील जाळीत पुजारी कुटुंबांना सरपंच व्यंकट मोरे यांची मदत

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील मौजे बोरेगाव येथील रहिवासी श्रीकांत म्हाळाप्पा पुजारी यांचे राहाते घर दिनांक ३ फेब्रुवारी २०२४ रोजी. दुपारी बारा वाजता. अचानक घर जळाले असून. साडेतीन लाखाचे नुकसान झाले आहे. घरातील एकही वस्तू शिल्लक नसल्याने. हे कुटुंब बेघर झाले आहे. पुजारी कुटुंब बेघर झाल्याची बातमी कळताच कुरनूर चे सरपंच व्यंकट मोरे यांनी सढळ हाताने तात्काळ ११००० रुपयाचे धनादेश पुजारी कुटुंबांना देण्यात आले. यावेळी युवा नेते सुनील चिकलंडे, श्रीशैल अलुरे, उपसरपंच नवनाथ जडगे, माजी सरपंच शिवानंद अण्णा पाटील, सामाजिक कार्यकर्ते राज अहमद जेऊरे, ज्येष्ठ नागरिक शणमुख हिरोळे माजी उपसरपच धुळाप्पा गोविदे आदी समस्त बोरेगाव ग्रामस्थ उपस्थित होते.



## पंढरपूर शहर पोलीस निरीक्षकपदी विश्वजीत घोडके

पंढरपूर/प्रतिनिधी:पंढरपूर शहर पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक पदी विश्र्वजीत घोडके यांची नियुक्ती झाली आहे गुरुवारी त्यांनी पदभार स्वीकारला आहे त्यांनी याच्या अगोदर सातारा तालुका पोलीस निरीक्षण म्हणून काम केलेले आहे त्यांची पंढरपूर येथे नियुक्ती करण्यात आली आहे येणाऱ्या दि. २० फेब्रुवारी रोजी होत असलेल्या मागे यात्रेची त्यांच्यावर मोठी जबाबदारी कमी वेळात येणार आहे त्यांनाही जबाबदारी पार पाडावी लागणार आहे याचबरोबर दररोज शहरांमध्ये असलेली वाहतुकीची कोंडी बस स्थानक वाळवंट इत्यादी होणारे भुरट्या चोऱ्या मंदिर परिसरातील भाविकांच्या चोरीचाही मोठा प्रश्र्न हाताळावा लागणार आहे अवैध वाळू वाहतूक अवैद्य सावकार की अवैद्य मटका जुगार असे अनेक बेकायदेशीर धंदे पंढरपूरमध्ये चालू आहेत याचा सुद्धा त्यांना मोठ्या प्रमाणात अंकुश बसवा लागणार आहे त्यांच्यावर ही मोठी जबाबदारी चे आव्हान आहे



## धनगर समाजाच्या कळंब तालुक्यात ठिक ठिकाणी घोंगडी बैठका



**ईटकुर ,चोराखळी, हासेगाव ,आंदोरा , उपळाई ,या ठिकाणी झाल्या बैठका..**

कळंब/सुधाकर रणदिवे : महाराष्ट्रातील धनगर समाज आरक्षन अंमलबजावणी करण्याच्या मागणीसाठी मागील अनेक वर्षांपासून धनगर समाज बांधव लढा देत आहे. यशवंत सेनेच्या वतीने सतत वेगवेगळ्या पद्धतीने आंदोलने चालू आहेत याच आंदोलनाच एक भाग म्हणून ११ फेब्रुवारी रोजी सरकारला ईशारा देण्यासाठी बीड येथे ईशारा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने बीड येथे महाराष्ट्रातील सर्व धनगर समाज मोठ्या संख्येने उपस्थित राहवा म्हणून कळंब शहरात यशवंत सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब दोलतडे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठकांचे आयोजन करण्यात आले होते.या बैठकीला यशवंत सेनेचे कळंब तालुका अध्यक्ष संभाजी हारकर यांच्या सह तालुक्यातील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते..

## राष्ट्रवादि काँग्रेस च्या जिल्हा उपाध्यक्षपदि रमेशकाका मोरे यांची नियुक्ती

पंढरपूर /संतोष मोरे : राष्ट्रवादि काँग्रेस चे खजिनदार राजेंद्र हजारे यांच्या हस्ते चळे ता.पंढरपूर येथील समाज समाज सेवक रमेशकाका मोरे यांना सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची जबाबदारी सोलापूर येथे पत्र देऊन देण्यात आली.यावेळि रामदास चौगुले सतीश गांडोळे मोहन काका गायकवाड श्रीकांत पंडित राहुल मोरे बालाजी मोरे धनाजी वाघमारे किरण माने रामभाऊ मोरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.या निवचे चळे ग्रामस्थांकडुन स्वागत करण्यात येत आहे.तसेच रमेशकाका मोरे मित्र मंडळा कडुन सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे.

## सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलेला वाव : बागल

पंढरपूर/प्रतिनिधीः शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे कलेमध्ये वाव मिळावा या हेतूने राबवण्यात येणार्या यश पब्लिक स्कुलच्या विविध उपक्रमांना यश येत असल्याचे त्यांच्या स्नेहसंमेलनातून जाणवत आहे.



परीक्षांमधून गुणवत्ता देणे तर सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलेला वाव देणे यांची मोठी सांगड या उपक्रमांमधून दिसून येते. आपला विद्यार्थी हा फक्त शिक्षणातच नव्हे तर क्रिडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातही अव्वल असावा हाच त्यामागील मानस आहे. असे प्रतिपादन एडवोकेट उदय बागल यांनी केले.

पंढरपूर तालुक्यातील रोपळे येथील यश पब्लिक स्कुलच्या स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. पुढे बोलताना बागल यांनी सांस्कृतिक कार्यक्रमांचे महत्व सांगुन विविध उपक्रमांचे कौतुक केले. यावेळी कार्यक्रमासाठी ॲड.शिवराज पाटील , सोमनाथ जगताप, अध्यक्षा प्रगती पाटील, शाळा समन्वयक विजय तुरेवाले, मुख्याध्यापक सचिन लोखंडे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी स्नेहसंमेलनामध्ये चिमुकल्यांनी नृत्य , नाटीका, गायण, देशभक्तीपर गीत आदींव्दारे प्रेक्षकांची वाहवा मिळवली. हा कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल संस्थेचे मार्गदर्शक पोलीस अधिकारी दशरथ पाटील यांनी शिक्षक, विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन केले.

तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक सचिन लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक सत्यवान लोखंडे, शंकर जाधव , ऐश्र्वर्या कुलकर्णी, अश्र्विनी पवार, भारती वराडे, सोनाली चव्हाण, अश्र्विनी जानकर , सोनाली नाईकनवरे, चंदा कुंभार, शिक्षकेतर कर्मचारी कल्याण म्हसवडे, उस्मान गोरे,पद्मिनी सुतार , अर्जुन पाटोळे यांनी परिश्रम घेतले.

## नॅशनल एक्सलन्स स्टार २०२४ पुरस्कारासाठी आवाहन

मुंबई : अंतरराष्ट्रीय मानव - हक्क सेवा परीषद ( महाराष्ट्र ) व आपले आदर्श मुंबई फाउंडेशनच्या वर्धापन दिनानिमित अपंग संस्था , अंध व मुकबधीर संस्था , आरोग्य व शिक्षण क्षेत्रात सामाजिक कार्य करणाऱ्या संस्था , विविध क्षेत्रात सामाजिक कार्य करणाऱ्या संस्था व समाज सेवकांचा नॅशनल एक्सलन्स स्टार अवॉर्ड या मानाच्या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे . या कार्यक्रमात सामाजिक , साहीत्य , कला व क्रिडा , नृत्य , लेखन , कृषी , सरपंच , उद्योग , पत्रकारीता अशा विविध क्षेत्रात दहा वर्षाहून अधिक उलेखनिय कामगीरी करणाऱ्या संस्था व व्यक्तींचा गौरव करण्यात येणार असल्याचे डॉ संजय भोईर यांनी जाहीर केल्याचे संस्थेचे अध्यक्ष भालचंद्र पाटे यांनी सांगीतले . तरी इच्छुकांनी आपला प्रस्ताव २८ फेब्रुवारी २०२४ पर्यंत bhoirsanjay@gmail.com या ईमेल वर मेल करावे . असे संयोजक वर्षा यादव व पुनम पाटगावे यांनी कळविले आहे .

## स्वेरीतील मेकॅनिकल इंजिनिअरींग विभागाचा ‘किर्लोस्कर फेरस लिमिटेड’ सोबत सामंजस्य करार

पंढरपूर: ‘गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल इंजिनिअरींग विभागाचा सोलापूर येथील ‘किर्लोस्कर फेरस लिमिटेड’ या कंपनीसोबत नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या सामंजस्य करारामुळे किर्लोस्कर या कंपनीची स्वेरीच्या विद्यार्थ्यांना करिअर घडविण्यासाठी मोलाची मदत मिळणार आहे.’ अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी दिली.

या कराराच्या माध्यमातून स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल विभागातील विद्यार्थ्यांना ‘इंटर्नशिप, इंडस्ट्री इंप्लांट ट्रेनिंग’ इ. च्या माध्यमातून विविध प्रकारचे फायदे होणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने करिअरसाठी कौशल्य विकास, भविष्यातील नवीन ट्रेंड्स बद्दल माहिती आणि प्रशिक्षण, या व्यतिरिक्त संस्थेच्या शिक्षकांना देखील कौशल्य विकासासाठी तसेच नवनवीन तंत्रज्ञान अवगत करण्यासाठी या व्यासपीठाचा उपयोग होणार आहे. या सामंजस्य करारावर ‘किर्लोस्कर फेरसच्या वतीने प्लांट हेड संतोष घुमाष्टे व स्वेरीच्या वतीने ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे प्रा.अविनाश मोटे यांनी तसेच संस्थेचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. स्वेरीचे अशाच प्रकारे इतर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय औद्योगिक संस्था, संशोधन संस्था, शैक्षणिक संस्था यांच्या सोबत सामंजस्य करार केलेले आहेत. या करारांचा फायदा शिक्षक व विद्यार्थ्यांना होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षण मिळावे या हेतूने १९९८ साली अभियांत्रिकी महाविद्यालयाची सुरवात झाली. तेथून पुढे विद्यार्थ्यांना केवळ शिक्षण देणे एवढ्यावरच न थांबता त्यांचा कल संशोधनाकडे कसा वळविला जाईल हे पाहून त्या दृष्टीने संस्थेने पाऊले उचलली आहेत. आता ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांबरोबरच शहरी व परराज्यातील विद्यार्थी देखील स्वेरीकडे शिक्षणासाठी वळत आहेत. स्वेरीचे विद्यार्थी कॅम्पस प्लेसमेंट, विद्यापीठात सर्वोच्च निकाल मिळविण्याबरोबरच प्रशासकीय नोकऱ्या व संशोधनाकडे वळत आहेत ही सोलापूर जिल्ह्यालाच नव्हे तर महाराष्ट्रालादेखील गौरवाची बाब आहे. हा करार पूर्ण होण्यासाठी विभागप्रमुख डॉ.एस.बी.भोसले, डॉ.पी.आर.कुलकर्णी व ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागातील प्राध्यापकांनी परिश्रम घेतले. यावेळी किर्लोस्करचे संतोष घुमाष्टे, ऋषिकेश कुलकर्णी यांच्यासह इतर प्राध्यापक उपस्थित होते. हा महत्त्वपूर्ण करार करण्यात आल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्र्वस्त व पदाधिकारी, कॅम्पस इनचार्ज डॉ. एम.एम.पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी सर्वांचे अभिनंदन केले.

## श्री सेवालाल जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सिताराम राठोड यांची निवड

दुधनी/प्रतिनिधीः दुधनी येथील गांधीनगर तांडा सेवालाल तरुण मित्र मंडळ आयोजित श्री सेवालाल जयंती उत्सव बैठक गांधीनगर तांडा येथील श्री सेवालाल व जगदंबा मंदीरात तांड्याचे नायक व कारभारी , जेष्ठ यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली . या बैठकीत १५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या श्री सेवालाल महाराज यांची २८६ जयंती साजरी करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आले . या वेळी जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सिताराम राठोड यांची सर्वानुमते अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली . यावेळी सुनिल चव्हाण ( उपाध्यक्ष ) , दत्तु राठोड ( सचिव ) , सुरेश पवार ( खजिनदार ) , आणि विलास जाधव ( कार्याध्यक्ष ) म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आले आहे . आधारस्तंभ म्हणून धेनु राठोड ( नायक ) , धेनु जाधव ( कारभारी ) , हिरू पवार (पुजारी ) यांची तर मार्गदर्शक म्हणून मन्नु राठोड , लक्ष्मण राठोड , रामू राठोड , जगन्नाथ जाधव , बाबु राठोड , भिल्लु जाधव , रवि राठोड (सर) , देविदास चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे . या निवडी नंतर अध्यक्ष व सर्व पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आले . यावेळी बंजारा समाज मोठ्या संख्येने उपस्थित होते .



